http://lokadesh.in

महाराष्ट्र शासन जाहिरात मान्यताप्राप्त साप्ताहिक

# लोकादेश

मूल्य १ रु.

मुख्य संपादक : साजीद बडगुजर

किनवट, वर्षे १७ वे, अंक ४२ वा,
सोमवार, दि.०७ ऑक्टोबर २०२४, पाने ०४

RNI No. MAHMAR/2007/20732
Post Regd.NO G-2/RNP/NND-323/2023-2025



# बंजारा समाजातील संतांनी देशाच्या अध्यात्मिक क्षेत्राला उर्जा दिली -प्रधानमंत्री नरेंद्र मोदी





## प्रधानमंत्र्यांच्याहस्ते बंजारा विरासत संग्रहालयाचे उद्घाटन

- नमो शेतकरी महासन्मान योजनेचा शेतक-यांना पाचवा हप्ता
- २३३०० कोटीच्या कृषी आणि पशुसंवर्धन उपक्रमांचा आरंभ
- कृषी पायाभूत सुविधेंतर्गत ७,५०० हून अधिक प्रकल्प समर्पित
- पशुधनासाठी स्वदेशी बनावटीच्या लिंग-वर्गीकृत वीर्य तंत्रज्ञानाचा आरंभ
- राज्यातील १९ मेगावॅटच्या पाच सौर ऊर्जा पार्कचे लोकार्पण




वाशिम, दि. ५ :- बंजारा समाजाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्वाची भूमिका निभावली. देशाच्या विकासासाठी प्रत्येक क्षेत्रात या समाजाने काम केले. समाजाने खूप संत दिले. या संतांनी देशाच्या आध्यात्मिक क्षेत्राला उर्जा दिली. बंजारा विरासत संग्रहालयामुळे समाजाची महान संस्कृती, प्राचीन परंपरा देशाच्या नवीन पिढीला परिचित होईल, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी येथे प्रधानमंत्र्यांच्या हस्ते बंजारा विरासत संग्रहालयाचे उद्घाटन, किसान सन्मान संमेलन तथा विविध विकासकामांचे लोकार्पण, लाभाचे वितरण झाले. त्यावेळी प्रधानमंत्री बोलत होते. यावेळी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंग चौहान, मत्स्यपालन व पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, पालकमंत्री संजय राठोड, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री धनंजय मुंडे, खा.अनुप धोत्रे, आ.चंद्रशेखर बावनकुळे, आ.निलय नाईक, आ.भावना गवळी, आ.किरण सरनाईक, आ.लखन मलिक, आ.वसंत खंडेलवाल, जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, बंजारा समाजाच्या विरासत संग्रहालयाचे उद्घाटन करण्याचे भाग्य लाभले. उद्घाटनानंतर समाजातील काही लोकांना भेटलो. संग्रहालयामुळे त्यांच्या चेह-यावर आनंद दिसून आला. या कार्यक्रमासाठी उपस्थित सर्वांनी या संग्रहालयाला भेट द्यावी, असे आवाहन करतो. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या काळात या संग्रहालयाच्या विकासासाठी प्रयत्न केले, त्यामुळे त्यांचे कौतुक करतो. संग्रहालयामुळे समाजाची महान संस्कृती, प्राचिन परंपरा देशाच्या नवीन पिढीला परिचित होईल, असे प्रधानमंत्री म्हणाले.

बंजारा समाजातील महापुरुषांनी देशासाठी खूप मोठे योगदान दिले. राजा लकी सिंग, संत सेवालाल महाराज, स्वामी हाती राम, संत रामराव बापू महाराजांसह अनेक संत, महंतांनी समाजाला निर्णायक नेतृत्व दिले व उत्तम मार्गदर्शन केले. केंद्र शासन या समाजाच्या विकासासाठी कार्य करीत आहे. राज्य शासनाने संत सेवालाल तांडा समृद्धी अभियान राबवून या समाजाला सक्षम करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले, असल्याचे प्रधानमंत्री म्हणाले.

नवरात्रीच्या शुभमुहूर्तावर पीएम किसान सन्मान निधी योजनेचे पैसे शेतक-यांच्या खात्यात वितरित करण्याचे भाग्य मला मिळाले आहे. केंद्राच्या योजनेसोबतच महाराष्ट्र सरकार शेतक-यांना नमो शेतकरी महासन्मान योजनेतून निधी देत असल्याने येथील शेतक-यांना दुप्पट लाभ होत आहे. केंद्र सरकारचा प्रत्येक निर्णय विकसित भारताच्या दिशेने कार्यरत आहे. शेतक-यांना सक्षम करण्याच्यादृष्टीने विविध पावले उचलण्यात येत आहेत. आज शेतक-यांच्यादृष्टीने महत्त्वाच्या प्रकल्पांचे व योजनांचे लोकार्पण झाले हे या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे.

महाराष्ट्र सरकारने ५० हजार करोड रुपयांच्या वैनगंगा -नळगंगा नदी जोड प्रकल्पाला मंजूरी दिली आहे. या प्रकल्पामुळे नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यांतील १० लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतक-यांना महाराष्ट्र सरकार मदत करत आहे. अमरावती येथील नुकतेच टेक्सटाईल पार्कचे उद्घाटन झाले. राज्य शासनाने सुरु केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना नारी शक्तीला सशक्त करणारी योजना असल्याचे प्रधानमंत्र्यांनी सांगितले.

**संग्रहालयामुळे बंजारा संस्कृती, परंपरांचे दर्शन घडेल - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

बंजारा संस्कृतीचे दर्शन घडविणा-या नगारा विरासत संग्रहालयाचे उद्घाटन हा ऐतिहासिक व सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा दिवस आहे. ख-या अर्थाने पोहरादेवी येथे काशी उभी राहिली असून बंजारा संस्कृती, परंपरांचे दर्शन होणार आहे. जगण्यासाठी भटकंती करणा-या बंजारा समाजाला संत सेवालाल महाराजांनी जगण्याचा मार्ग दाखविला. प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न करणा-या या समाजाने आपली संस्कृती जपली. आता त्यांच्या या संस्कृतीचे जतन संग्रहालयाच्या माध्यमातून होणार आहे. संत सेवालाल यांच्या स्मारकामुळे राज्याला पुढे घेवून जाण्यासाठी प्रेरणा मिळेल. राज्य शासनाने या प्रकल्पासाठी ७०० कोटीचा निधी वितरित केला आहे. 'सबका साथ सबका विकास' हे ब्रीद घेऊन चालणारे नरेंद्र मोदी यांनी संत सेवालाल महाराजांचे तत्व स्वीकारले आहे. प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वात देशाचा विकास होत आहे, ही देशासाठी अभिमानास्पद बाब आहे. राज्यातील जनतेच्या हिताचे निर्णय घेण्यात येत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचे कार्य सुरू असून ही योजना बंद होऊ देणार नाही. या योजनेतून राज्यातील २ कोटी पेक्षा अधिक महिलांना तीन महिन्यांचे सहाय्य वितरण करण्यात आले आहे. राज्य सरकार समाजातील शेतकरी, कष्टकरी, युवक अशा सर्व घटकांना न्याय देण्याचे कार्य करीत आहे. त्यामुळे राज्य सरकार हे आता आपले लाडके सरकार झाले आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.

**बंजारा समाजाच्या काशीचा कायापालट केला - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

ज्यांनी बाबा विनाथाच्या काशीचा कायापालट केला ते आज बंजारा समाजाच्या काशीचा कायापालट पाहण्याकरिता व त्याच्या उद्घाटनासाठी आले आहेत. मोदीजींचे बंजारा समाजाशी एक घट्ट नाते आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर नरेंद्र मोदी हे पोहरागडाला भेट देणारे पहिले प्रधानमंत्री आहेत.

राज्याचा मुख्यमंत्री असताना रामराव बापूंनी मला पोहरादेवीच्या विकासाची जबाबदारी दिली होती. या ठिकाणी आज बंजारा विरासत संग्रहालय उभे राहिले आहे. मंदिराचा विकास झाला आहे. पाहिलेले स्वप्न आम्ही पूर्ण केले. मोदीजींनी किसान सन्मान योजना आणि राज्य शासनाने नमो किसान महासन्मान योजना आणली. या योजनांचे हप्ते प्रधानमंत्र्यांच्याहस्ते वितरीत करण्यात येत आहेत. शेतक-यांना दिवसा वीज देण्याचे आाासन राज्य शासनाने पूर्ण केले. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पाच सौर उर्जा प्रकल्पांचे उद्घाटन होत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल श्री.फडणवीस यांनी देखील प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.

**विरासत संग्रहालय गौरवाचे प्रतिक - उपमुख्यमंत्री अजित पवार**

बंजारा विरासत संग्रहालय हे बंजारा समाजाची संस्कृती, परंपरा, वारसा, अस्मिता, इतिहास याचे गौरवशाली प्रतीक ठरेल. या संग्रहालयाच्या रूपाने एक वैभवशाली व भव्य वास्तू येथे उपलब्ध झाली. संग्रहालयाच्या माध्यमातून निसर्गपूजक लढवय्या बंजारा समाजाच्या संस्कृती, परंपरांचे सर्वांना दर्शन घडेल असा मला विाास आहे.

या संग्रहालयासह विकास आराखड्याची सुरुवात देवेंद्र फडणवीस यांनी २०१७ मध्ये २५ कोटी रुपये देऊन केली होती. नंतर श्री.फडणवीस यांनी १०० कोटीचा निधी जाहीर केला. त्यानंतर आता ७०० कोटींचा आराखडा शासनाने मंजूर केला आहे. पोहरादेवी तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, असे उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी सांगितले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.

**बंजारा समाजाच्या विकासासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न व्हावे - पालकमंत्री संजय राठोड**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे पोहरादेवी येथे आगमन म्हणजे बंजारा समाजासाठी आणि महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. बंजारा समाजाचा इतिहास गौरवशाली आहे. देशातील या समाजाला राज्यघटनेच्या एका सूचित आणण्यासाठी सहानुभूतीपूर्वक विचार होणे आवश्यक आहे. देशभर बंजारा समाजाची संस्कृती व भाषा एकसारखी आहे. त्यामुळे बंजारा भाषेला संरक्षित करण्यासाठी तिचा राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचित समावेश करण्यात यावा, असे पालकमंत्री म्हणाले.

बंजारा तांड्यांचा चतुरस्त्र विकास होण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर तांडा विकास महामंडळ स्थापन करण्याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा. स्वदेश योजनेंतर्गत पोहरादेवीच्या विकासासाठी केंद्र शासनाची मदत आवश्यक आहे. यवतमाळ, वाशिम जिल्ह्यांत रोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी जीएसटीसह अन्य करांमध्ये सूट मिळणे आवश्यक असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

यावेळी मनोगत व्यक्त करतांना केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र शासन सातत्याने शेतकरी हिताचे उपक्रम राबवत आहे. सोयाबीन उत्पादकांना दिलासा देण्यासाठी सोयाबीन तेलाच्या आयात निर्यातीच्या दरात आवश्यक बदल करण्यात आले. शेतक-यांच्या मालाला चांगला भाव मिळावा यासाठी उत्पादन खर्चाच्या ५० टक्के अधिक दर देऊन किमान आधारभूत किंमत ठरविली जात आहे. युरीया आणि डीएपीचे दर शेतक-यांना परवडण्यासारखे नाहीत, त्यामुळे यावर शासन मोठ्या प्रमाणावर अनुदान उपलब्ध करून देते, असे श्री.चौहान म्हणाले.

केंद्रीय मत्स्यपालन व पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंग म्हणाले, पशुधनासाठी युनिफाईड जिनोमिक चिप आणि स्वदेशी बनावटीच्या लिंगवर्गीकृत वीर्य तंत्रज्ञानाचा प्रधानमंत्र्यांच्याहस्ते आरंभ होत आहे. शेतक-यांच्या पशुधनात वाढ होण्यासाठी शेतक-यांना परवडणा-या किंमतीत लिंग वर्गीकृत वीर्याची उपलब्धता वाढविण्यासाठी हा उपक्रम सुरु करण्यात येत आहे. यामुळे वीर्याची मात्रा सुमारे २५० रुपयांपर्यंत उपलब्ध होतील. देशी पशुधनासाठी युनिफाईड जिनोमिक चिप, गौचिप आणि म्हशींसाठी माहीचिप जिनोटायपिंग सेवांसह विकसित करण्यात आल्या आहे. जनुकीय निवडीच्या अंमलबजावणीमुळे तरुण उच्च दर्जाच्या बैलांची कमी दरात निवड करणे शक्य होणार असल्याचे ते म्हणाले.

**विविध उपक्रमांचा आरंभ, लोकार्पण व लाभाचे वितरण**

प्रधानमंत्र्यांनी सुरुवातीस बंजारा विरासत संग्रहालयाचे लोकार्पण केले व पाहणी केली तसेच बंजारा बांधवांशी संग्रहालयात संवाद साधला. मुख्य समारंभात ९.४ कोटी शेतक-यांना २० कोटी रुपयांचा पीएम किसान सन्मान निधीचा १८ वा हप्ता वितरित केला. सोबतच राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या सुमारे २ हजार कोटी रुपयांच्या ५ व्या हप्त्याचेही वितरण केले. सुमारे २३ हजार ३०० कोटी रुपये खर्चाच्या कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित अनेक उपक्रमांचा आरंभ केला. प्रधानमंत्री कृषी पायाभूत सुविधा निधी निधी अंतर्गत १ हजार ९२० कोटी रुपयांचे ७,५०० हून अधिक प्रकल्प राष्ट्राला समर्पित केले. सुमारे १ हजार ३०० कोटी रुपयांची एकत्रित उलाढाल असलेले ९,२०० शेतकरी उत्पादक संघटना राष्ट्राला समर्पित केल्या. पशुधनासाठी युनिफाईड जिनोमिक चिप आणि स्वदेशी बनावटीच्या लिंग-वर्गीकृत वीर्य तंत्रज्ञानाचा आरंभ करण्यात आला. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना - २.० अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात १९ मेगावॅट क्षमतेचे पाच सौर ऊर्जा पार्कचे लोकार्पण करण्यात आले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांना धनादेशाचे वितरण करण्यात आले.

### प्रधानमंत्री यांच्या हस्ते शेतक-यांना दिवसा वीज पुरवठ्यासाठी ५ सौर उर्जा प्रकल्पांचे लोकार्पण



**वाशिम, दि. ५ : शेतक-यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात उभारण्यात येणा-या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या पहिल्या पाच सोलर पार्कचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाशिम जिल्ह्यात पोहरादेवी येथे करण्यात आले.**

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय पंचायत राजमंत्री राजीव रंजन ऊर्फ ललन सिंह, उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, जलसंधारणमंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड व कृषीमंत्री धनंजय मुंडे यावेळी उपस्थित होते.

कृषी फीडर्सना सौर ऊर्जेद्वारे निर्माण केलेल्या विजेचा पुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाभियान अर्थात पीएम कुसुम योजनेच्या आधारे राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये ९२०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीचे काम सध्या सुरू असून ते टप्प्या टप्प्याने सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होणार आहे. त्यापैकी धोंदलगाव (जिल्हा छत्रपती संभाजीनगर), बामणी बुद्रक (जिल्हा नांदेड), हरोली (जिल्हा कोल्हापूर), जलालाबाद (जिल्हा अकोला), पलशी बुद्रुक (जिल्हा बुलढाणा) या एकूण १९ मेगावॅट क्षमतेच्या पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण झाले. सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीस मदत करणा-या ४११ ग्राम पंचायतींना प्रधानमंत्र्याच्या हस्ते २०.५५ कोटी रुपये विकासनिधी ऑनलाईन पद्धतीने देण्यात आला.

शेतक-यांना कृषी पंपांसाठी सध्या दिवसा व रात्री असा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा करण्यात येतो. केवळ दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करावा अशी त्यांची मागणी आहे. पीएम कुसुम अर्थात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे शेतक-यांची मागणी पूर्ण होणार आहे. या योजनेत सौर ऊर्जा निर्मितीसाठी दरवर्षी सव्वा लाख रुपये प्रती हेक्टर दराने जमीन भाड्याने देण्याचीही सुविधा शेतक-यांसाठी आहे.

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बंजारा विरासत संग्रहालयाचे लोकार्पण बंजारा समाजाच्या प्रतिष्ठीत व्यक्तींशी संवाद



**वाशिम, दि. ५ : बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या मानोरा तालुक्यातील तिर्थक्षेत्र पोहरादेवी येथील बंजारा विरासत संग्रहालयाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.**

यावेळी, प्रधानमंत्री मोदी यांनी नंगारा भवन परिसरातील बंजारा विरासत संग्रहालयाची पाहणी करुन बंजारा समाजाच्या संस्कृती व इतिहास यासंदर्भात माहिती जाणून घेतली. तसेच नगारा वाद्याचे वादनही त्यांनी केले. यावेळी बंजारा समाजातील परंपरागत नृत्य प्रधानमंत्र्यांसमोर सादर करण्यात आले.

श्री. संत सेवालाल महाराज, पोहरादेवी तीर्थश्रेत्र विकास आराखड्यांतर्गत ७२३ कोटी रुपये खर्चून या तीर्थश्रेत्राचा सर्वांगीण विकास करण्यात येणार आहे. या संग्रहालयात बंजारा समाजातील रुढी-परंपरा, पारंपारिक वेशभूषा, सांस्कृतिक इतिहास आदीबाबत विविध कलाकृतींच्या माध्यमातून माहिती प्रतिबिंबीत केली आहे. यावेळी प्रधानमंत्रीनी बंजारा समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती आणि संतमहंत यांच्यासोबत मनमोकळा संवाद साधला.

यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

**प्रधानमंत्र्यांचे स्वागत**

सकाळी प्रधानमंत्र्यांच्या हेलिकॉप्टरचे वाईगौळ येथील हेलिपॅडवर आगमन झाले. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रधानमंत्र्यांचे स्वागत केले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड तसेच अपर पोलीस महासंचालक नवल बजाज, जिल्हाधिकारी बुवनोरी एस., जिल्हा पोलीस आयुक्त अनुज तारे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी पोहरादेवी येथील जगदंबा मातेचे तसेच संत सेवालाल महाराज व संत रामराव महाराज यांच्या समाधींचे दर्शन घेतले.

# महिला सशक्तीकरण अभियान मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान व राज्यस्तरीय योजनांचे लोकार्पण




## लाडकी बहीण योजनेच्या लाभाची रक्कम टप्प्या-टप्प्याने वाढविणार- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**छत्रपती संभाजीनगर, दि.६, (विमाका) :- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही नेहमी सुरु रहावी यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात आली असून ही योजना बंद तर पडणार नाहीच उलट लाभाची रक्कम ही टप्प्या टप्प्याने वाढविण्यात येईल,असा शब्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे आपल्या लाडक्या बहिणींना दिला.**

छत्रपती संभाजीनगर येथे खडकेश्वर परिसरात मराठवाडा सांस्कृतिक मंडळ मैदान येथे मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान अंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडला.

पालकमंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट, खा. डॉ. भागवत कराड, आ. सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. प्रदीप जयस्वाल, आ. रमेश बोरनारे, उर्जा विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे, जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड उपस्थित होते.

**लाडकी बहिण योजनेचे पंतप्रधानांकडून कौतुक**

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरु केली आहे. या योजनेतून महिलांना दरमहा दीड हजार रूपयांचा लाभ दिला जात आहे. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे एकत्रित तीन हजार रूपये महिलांच्या खात्यात सुरु करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. यापूर्वी तीन महिन्यांचे साडेचार हजार रूपये महिलांच्या खात्यात जमा केले आहेत. गरिबीची जाणीव असल्याने या सरकारने गोरगरीब महिलांच्या संसाराला मदत करण्यासाठी ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला. समारे अडीच कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. या योजनेतून मिळणाया रक्कमेतून काही महिलांनी छोटे-छोटे व्यवसाय सुरु केले असून त्यामधून रोजगार आणि आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण झाले आहे. या महिला स्वतःच्या पायावर उभा राहिल्या आहेत, असेही ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे कौतुक केले आहे. महिला सक्षमीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्राचे कार्य हे देशासाठी दिशादर्शक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबद्दल राज्य शासनाचे कौतुक केले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी पुरेशी तरतूद केली असून ही योजना बंद होणार नाही, उलट भविष्यात लाभाची रक्कम टप्प्या-टप्प्याने वाढविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

**कृषीपंपांसाठी शून्य वीज बिलामुळे शेतक-यांना लाभ**

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शेतीसाठी साडेसात अश्वशक्तीपर्यतच्या कृषीपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. जवळपास ४५ लाख शेतक्यांना या योजनेचा लाभ झाला असून त्यांचे वीज बिल शून्य झाले आहे. युवकांना रोजगाराचे प्रशिक्षण देण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु केली. यामधून प्रशिक्षण काळात त्यांना सहा हजार ते दहा हजार रूपये विद्यावेतन दिले जात आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत असून यामधून उभा राहणा-या उद्योगांमुळे राज्याच्या विकासाला गती मिळेल. रोजगार निर्मिती होईल. मुख्यमंत्री वयोश्री योजनेतून वयोवृद्ध नागरिकांना विविध उपकरणे खरेदीसाठी तीन हजार रूपयेपर्यंत सहाय्य करण्यात येणार आहे.

**शासनाच्या योजनांमुळे सर्वसामान्यांना आधार**

प्रधानमंत्री मोदीजींनी ठाणे आणि मुंबईतल्या ३३ हजार कोटींपेक्षा जास्तीच्या प्रकल्पांची पायाभरणी केली आहे. शेंद्राच्या ऑरिक सिटीचं नाव तर जगभर गाजायला सुरुवात झाली आहे. टोयाटो किर्लोस्करचा २० हजार कोटींचा प्रकल्प तिथे होत आहे. लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुलींसाठी मोफत उच्च शिक्षण योजना, शेतक्यांसाठी मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना अशा अनेक योजना सर्वसामान्यांना आधार देणाया ठरल्या असल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

**महिलांना विकासाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना उपयुक्त- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशाला विकासाकडे नेण्यासाठी महिलांना विकासाच्या केंद्रस्थानी आणणे आवश्यक आहे, असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणतात. त्यानुसार महिलांना विकासाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना उपयुक्त ठरत आहे. केंद्र शासनाने महिलांसाठी बेटी बचाओ, बेटी पढाओपासून ते लखपती दीदी सारख्या विविध योजना हाती घेतल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनामार्फत लेक लाडकी योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबविण्यात येत आहे. लेक लाडकी योजनेतून मुलीच्या जन्मानंतर तिच्या बँक खात्यावर टप्प्या-टप्प्याने एक लाख रूपये जमा केले जात आहेत. महिलांना एसटी बस प्रवासात ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दरमहा दीड हजार रूपये दिले जात आहेत. ही योजना बंद होणार असलाचा अपप्रचार काही लोकांकडून केला जात आहे, मात्र यापुढेही ही योजना अशीच सुरु राहील, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी दिला.

**दुष्काळ मुक्तीसाठी पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी मराठवाड्यात आणण्यास मंजूरी**

मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी पश्चिम वाहिन्या नद्यांचे पाणी मराठवाड्यात आणण्याच्या कामाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. पुढील काही वर्षात हे काम पूर्ण होणार असून त्यानंतर मराठवाड्यातील दुष्काळ कायमचा दूर होईल. साडेसात एचपी पर्यंतच्या कृषीपंपाला मोफत वीज पुरवठा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार शेतक-यांना शून्य रक्कमेची वीज बिले वाटप सुरु झाले आहे. या योजनेची रक्कम शासनाने महावितरणला जमा केली आहे. आता पुढील पाच वर्षे शेतक्यांना वीज बिल भरण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्र हे शेतक्यांची वीज कंपनी स्थापन करणारे पहिले राज्य बनले आहे, असा उल्लेख त्यांनी केला.

प्रास्ताविक पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले. विविध योजनांचे लोकार्पण मान्यवरांचा हस्ते करण्यात आले. यामध्ये मोफत वीज बील योजना, मागेल त्याला सौर कृषि पंप योजना, पिंक ई रिक्षाचे लोकार्पण करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर विभागातील चांगल्या कार्याबद्दल विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्यासह जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस विभाग यांचा गौरव करण्यात आला. यावेळी महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

# गोकुंद्यात युवतीचा विनयभंग; शिक्षकावर गुन्हा



**किनवट - स्वतःच्या घरात भाड्याने राहाणा-या युवतीचा एका शिक्षकाने विनयभंग करून तिच्या मोबाईलवर लज्जास्पद मेसेज पाठविल्या प्रकरणी पोलिसांनी त्या शिक्षकाविरूद्ध अॅट्रॉसिटीसह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल केला.**

किनवट तालुक्याच्या दिग्रस जि.प.शाळेतील शिक्षक व किनवट येथे प्रभारी केंद्रप्रमुख असलेले गणेश नुरसिंग जाधव यांचे गोकुंद्याच्या नाईकनगरात घर आहे. यवतमाळ जिल्ह्याच्या उमरखेड तालुक्यातील खरबी येथील एक १८ वर्षीय विद्यार्थिनी गोकुंदा येथे बारावीनंतरचे शिक्षण घेण्यासाठी आली. ती विद्यार्थिनी गणेश जाधव यांच्या घरात भाड्याने राहात होती. जाधव यांनी दि.२९ सप्टेंबरच्या रात्री सदर विद्यार्थिनी घरात बसली असता, वाईट हेतुने तिचा हात धरून विनयभंग केला. तिचा मोबाईल नंबर घेवून त्यावर अश्लिल, लज्जास्पद मेसेज पाठवले, अशी तक्रार विद्यार्थिनीने शनिवारी दि. ५ ऑक्टो. किनवट पोलीस ठाण्यात दिली. तिच्या कबुली जबाबानंतर पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला यांनी शिक्षक गणेश जाधव यांच्याविरूद्ध अॅट्रासिटीसह भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७५, ७८ व अन्य कलमान्वये गुन्हा दाखल केला. रविवारी सायंकाळपर्यंत जाधव यांना अटक झाली नव्हती. याप्रकरणाची अधिक चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे करीत आहेत.

# मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एकावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा



**किनवट - मजुरीचे पैसे मागितल्याच्या कारणावरून एकास लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गोकुंदा येथील इसमाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला.**

गोकुंदा येथील राजर्षी शाहूनगर येथील महेश जठाळे हा मजूर शुक्रवारी दि.४ दत्तनगर, गोकुंदा येथील समीर खान याच्याकडे त्याच्या भावाने काम केलेल्या मजुरीचे पैसे मागण्यासाठी गेला होता.त्यावेळी समीर खान याने महेश जठाळे याला कालच्या प्रकरणावरून घरी येवून माझ्या आईची माफी माग,तरच पैसे देतो असे म्हणाला.त्यावर महेश याने तुच तुझ्या आईला इकडे घेवून ये,आम्ही इथेच तुझ्या आईची माफी मागतो,असे सांगताच आरोपी समीर खान याने महेश व त्याचा भाऊ सूरज यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी महेश जठाळे यांनी रविवारी दि.६ किनवट पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी समीर खान याच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम ११५ (२), ३५२, ३५१ (२) व अॅट्रासिटी कायद्यातंर्गत गुन्हा दाखल केला. डीवायएसपी रामकृष्ण मळघणे अधिक चौकशी करीत आहेत.

# राज्य कर्मचा-यांच्या अग्रीममध्ये वाढ करून मासिक वेतन दिवाळीपूर्वीच देण्याची मागणी



**किनवट, दि.०६ : राज्य सरकारी कर्मचा-यांना दीवाळी सणानिमित्त दरवर्षी देण्यात येणाऱ्या १२ हजार ५०० रूपये अग्रिममध्ये वाढ करून तो २० हजार रूपये करण्यात यावा. तसेच राज्य सरकारी कर्मचा-यांना देय असलेले माहे ऑक्टोबर २०२४ चे मासीक वेतन हे कर्मचाऱ्यांना दीपावली सणापूर्वीच अर्थात दि.२२ ते २५ ऑक्टोबर या कालावधीत अदा करण्यात यावे, अशा दोन प्रमुख मागण्या येथील शासकीय व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी तालुका समन्वय समितीचे सचिव एस.एस. धानोरकर यांनी समितीच्या तर्फे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे दोन स्वतंत्र निवेदनाद्वारे केल्या आहेत.**

निवेदनात म्हटले की, महागाई प्रचंड वाढल्यामुळे राज्य कर्मचा-यांना शासनाकडून दरवर्षी दिवाळीनिमित्त दिल्या जाणारी १२ हजार ५०० रूपये ही आगाऊ रक्कम (अग्रिम) अपुरी पडत असते. सातत्याने मागणी करूनही सरकारचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे कर्मचा-यांना दिवाळी साजरी करण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे हे अग्रिम २० हजार रूपयांपर्यंत वाढविण्यात यावे. तसेच सदरील अग्रिम हे शासकीय कर्जच असल्यामुळे राज्य कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून दरमहा दोन हजार रूपये कपात करून घ्यावेत, असे सुचविले असून, कर्मचा-यांची दिवाळी आनंदात जाण्यासाठी त्यांच्या अग्रिमच्या रकमेत वाढ करून दिलासा देण्याची मागणी पहिल्या निवेदनात केली आहे.

तसेच राज्य अधिकारी व कर्मचा-यांसह सेवानिवृत्त कर्मचा-यांनाही दिवाळी सारखा महत्वपूर्ण सण आपल्या कुटुंबियांसोबत आनंदात घालविण्यासाठी आर्थिक चणचण भासू नये म्हणून माहे ऑक्टोबर २४ चे वेतन दिवाळीनंतर नोव्हेंबर २४ मध्ये देण्याऐवजी दिवाळीच्या दोन-चार दिवस पूर्वीच दिल्यास त्यांना सण साजरा करण्यासाठी उत्साह येऊन नियोजन करता येईल. सोबत ऑक्टोबर चे वेतन दि.२२ ते २५ दरम्यान दिल्यास सर्व कर्मचा-यांसाठी ही सरकारतर्फे अनोखी भेटही ठरेल. त्यामुळे दिवाळीसणापूर्वीच वेतन देण्याची घोषणा करून आश्वासित करण्याची विनंती दुस-या स्वतंत्र निवेदनात केली आहे. राज्य शासन या बाबतीत काय भूमिका घेते याकडे राज्य कर्मचा-यांचे डोळे लागले आहेत.

# खरीपातील ई-पीक पाहणी ६९.०३ टक्के

## किनवट तालुक्यातील स्थिती ; प्रत्यक्ष पेरणी क्षेत्र व ई-पीक पाहणी क्षेत्रात २४ हजार ४८७ हेक्टरचा फरक

किनवट, दि.३० : किनवट तालुक्यातील यंदाच्या खरीप हंगामात गत २३ सप्टेंबरपर्यंत ३६ हजार ५७३ शेतकरी खातेदारांनी एकूण ५४ हजार ५९० हेक्टर क्षेत्रातील ई-पीक पेरा पाहणी अर्थात नोंदणी केलेली असून, त्याची टक्केवारी ६९.०३ आहे. यापुढील ई-पीक पाहणी तलाठीस्तरावर करण्यात येणार असल्याची माहिती महसूल विभागाच्या सूत्रांनी दिली.

किनवट तालुक्याचे भौगोलीक क्षेत्र १,५५,४३५.६५ हेक्टर असून, खरीप हंगामासाठीचे सर्वसाधारण क्षेत्र ७८ हजार ००१ हेक्टर आहे. महसूल विभागाच्या नोंदीनुसार यंदाच्या खरीप हंगामात तालुक्यातील ९ महसूल मंडळातील १७१ गावामध्ये ७९ हजार ०७७ हेक्टरवर पीक पेरणी झालेली असून, शेतकरी खातेदारांची एकूण संख्या ६० हजार ३४८ आहे. यानुसार अंतिम पीक पेरणी क्षेत्र व ई-पीक पाहणी क्षेत्रामध्ये २४ हजार ४८७ हेक्टरचा फरक आहे. मुदत संपल्यामुळे २३ हजार ७७५ शेतकरी खातेदारांची वैयक्तिकरित्या ई-पीक पाहणी करणे राहून गेले आहे.




केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतक-यांनी पेरलेल्या पिकांचा पेरा ई-पीक पाहणी अॅसपवर नोंदविणे आवश्यक आहे. यंदा किनवट तालुक्यात पावसाच्या आगमनानुसार झालेल्या पेरण्या जुलैच्या तिसरा आठवड्यापर्यंत रखडल्या होत्या. त्यामुळे ई-पीक पेरा नोंदणीस उशिरा झाला. ई-पीक अॅपच्या वापराबाबत कृषी, महसूल, ग्रामविकास विभागाने पुरेशी जागृती करूनसुद्धा अनेक शेतक-यांना ई-पीक पाहणीचे महत्व अजूनही समजलेले नाही. खरीप हंगाम २०२४-२५ मधील पीकपाहणी नोंदवण्यासाठी महसूल विभागाने दि. ०१ ऑगस्टपासून सुरुवात केली होती. परंतु सततच्या वीज पुरवठा खंडित होण्यासह इतर तांत्रिक अडचणी, शासकीय सुट्ट्या, अवकाळी पाऊस अशा विविध कारणांमुळे बहुसंख्य शेतक-यांना ई-पीक पाहणी करता आली नाही. त्यातच १५ सप्टेंबर ई-पीक पाहणी करण्याची शेवटची तारीख होती. आडवळणाच्या भागातील शेतामध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटी व्यवस्थित मिळत नाही. सर्व्हर डाउन राहू लागले आदी कारणांमुळे ई-पीक पाहणी प्रक्रियेत गतीमानता नव्हती. तसेच ई-पीकपाहणी बाबत बरेच शेतकरी उदासीन आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील प्रत्येक गावातील किमान २०० शेतक-यांची ई-पीक नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवून दोन दिवस विशेष मोहीम राबविली गेली. पुढे राज्य शासनाने शेतकरीस्तरावरील ई-पीक पाहणीच्या नोंदणीसाठी २३ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली. परिणामी, २३ सप्टेंबरपर्यंत केल्या गेलेल्या ई-पीक पाहणीमध्ये ३६ हजार ५७३ शेतकरी खातेदारांची ५४ हजार ५९० हेक्टर क्षेत्रापर्यंत वाढ झाली आहे. तरीही सुमारे ३१ टक्के पेरणी क्षेत्राची ई-पीक पाहणी राहून गेली आहे. त्यामुळे ज्या २३ हजार ७७५ शेतक-यांनी आपण पेरलेल्या पिकांची नोंद मोबाईल अॅपद्वारे ई-पीक पाहणीमध्ये केलेली नाही, त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ, नुकसान भरपाई मदत व किमान आधारभूत किंमतीनुसार खरेदीचा लाभ मिळविणे अवघड जाणार आहे. शासनाने या पुढील पीक पाहणीची मुदतवाढ तलाठीस्तरावर देखील देण्याचा निर्णय घेतला आहे. आता तलाठी स्तरावरील ई-पीक पाहणी तपासणीची मुदतीत देखील वाढ केली आहे . आता २४ सप्टेंबर ते २३ ऑक्टोबर या कालावधीत सहाय्यक आणि तलाठी हे देखील पीकपाहणी करू शकतील.




# किनवट पालिका क्षेत्रातील ७.५० कोटींच्या विविध विकासकामांचे आमदार केराम यांचे हस्ते भुमीपूजन



**लोकादेश न्यूज, किनवट : आ. भीमराव केराम यांच्या स्थानिक विकास निधीतील पालिका क्षेत्रातील एकूण ७.५० कोटींच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन सोमवार दि. ७ रोजी आ.केराम यांच्या हस्ते होणार आहे.**

शहराच्या प्रभाग क्र. ६ मधील शिशुवाटिकेत योगाभवन उभारून परिसराचा विकास करणे, याच प्रभागातील श्रीकृष्ण मंदिरात पेवर ब्लॉक बसविणे, प्रभाग २ मधील बुद्धविहारात समाजमंदिर उभारणे, याच प्रभागातील साठेनगरात मातंग समाजमंदिर उभारणे, हनुमान मंदिरालगत सभागृह, प्रभाग १ मधील अक्सा मशिदीत पार्किंग पेवर ब्लॉक बसविणे, याच प्रभागात अंतर्गत सीसी रस्ते, प्रभाग ३ मधील गुरुकूल शाळेजवळ सीसी रस्ता, प्रभाग क्र.३ व ४ मधील अंतर्गत सीसी रस्त्याच्या निर्माणाचे भूमिपूजन आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते सोमवारी सकाळी १० ते दुपारी २.३० पर्यंत होणार आहे.

> किनवट शहरातील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन सर्व विकासकामे पार पाडली जातील. मराठवाड्यातील मागास भाग हा डाग पुसून किनवट एक विकसित शहर म्हणून रोल मॉडेल तयार करण्याचे माझे ध्येय आहे. मी गरीब कुटुंबातील व्यक्ती असल्याने पूर्वी पासूनच माझी सर्वसामान्य जनतेशी नाळ जुळून आहे. माझ्या विकासात्मक कार्यामुळे येथील जनता माझ्यावर अतोनात प्रेम करते त्यामुळे मतदार संघाचा सर्वांगीण विकास साधने हे माझे कर्तव्य नव्हे तर जबाबदारी असल्याचे आ भीमराव केराम म्हणाले.

## नांदेड विमानतळावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आमदार भीमराव केराम यांनी स्वागत केले.



नांदेड : बंजारा समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या पोहरादेवी जाण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे आले असता नांदेड विमानतळावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आमदार भीमराव केराम यांनी स्वागत केले.

# चतुर्थीच्या दिवशी लाखो भाविकांनी घेतले श्री रेणुका मातेचे दर्शन!





**माहूर, ता. ६ (बातमीदार) गडावरील नवरात्रोत्सवाच्या चौथ्या दिवशी सकाळी ७ वाजता मातेच्या वैदिक महापुजेस सुरुवात करण्यात आली, त्यानंतर मातेला अलंकारासह नारंगी रंगाचे पैठणी महावस्त्र अर्पण करून वेद पारायण सुरु करण्यात आले, दुर्गा सप्तशती शतचंडीपाठास हजारो भाविकांच्या उपस्थितीत सुरुवात करण्यात आली.**

दुपारी पायस नैवेद्य व आरती झाल्यानंतर छबीना मिरवणूक काढण्यात आली, परिवार देवतांचे पूजन झाल्यानंतर भाविकासाठी भगवान परशुराम मंदिर परिसरात महाप्रसाद महा अन्नदान सुरू करण्यात आले, यानंतर मातेस पायस महानैवेद्य, गाईचे तूप, आणि केळी अर्पण करण्यात आला. त्यानंतर महाआरती द्वारे दुपारचे धार्मिक कार्यक्रम सुरू करण्यात आले, चतुर्थीच्या दिवशी माता दरबारात पिसा देव छत्रपती संभाजी नगर येथील श्री जगदंब म्युझिकल ग्रुप यांनी भजन सादर केले, दहिसर येथील दीपिका जोशी यांनी गायन सादर केले, नरसी नायगाव जिल्हा नांदेड येथील गणेश हाके, सरस्वती कुमारी यांनी गायन सादर केले, छत्रपती संभाजीनगर येथील शांती भूषण व कल्याणी चारठाणकर यांनी गायन सादर केले. पुणे येथील भक्ती उदय पांडव यांनी बहारदार नृत्य सादर केले, जालना येथील भक्ती सुनील पवार हिने गायन सादर केले, पुणे येथील अंबिका व श्रीपाद लिंबेकर यांनी गायन भक्तीमय वातावरणात सादर केले. चौथ्या मानेला रविवार हा सुट्टीचा दिवस असल्याने रेणुका मातेच्या भाविक भक्तांचा मोठा जनसागर लोटला होता त्यामुळे व्यवस्थापन सांभाळणारी यंत्रणा मात्र हतबल असल्याचे दिसून आले.

# मराठा सेवा संघ नांदेड जिल्हा कार्यकारीणी जाहीर



**लोकादेश न्यूज नांदेड : मराठा सेवा संघ नांदेड उत्तर दक्षिण जिल्हा कार्यकारिणी बैठक प्रदेश सहसचिव डॉ.पंजाबराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण मराठा मुलांचे वसतिगृह नवा मोंढा नांदेड येथे पार पडली.जिल्हा कार्यकारिणी गठीत करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.प्रारंभी राष्ट्रमाता माँ.साहेब जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण जिजाऊ वंदनेने बैठकीला सुरुवात करण्यात आली.**

जिल्हा कार्यकारिणीत दक्षिणच्या जिल्हा सचिव पदी रमेश पवार जिल्हा कार्याध्यक्षपदी बळीराम फाजगे रवि ढगे,सहसचिव गोविंदराव वर्ताळे,जिल्हा उपाध्यक्ष हौसाजी गाढे, संतोष लोंढे, डॉ प्रभाकर जाधव, इजि संजय लोंढे, शंकर जाधव, जेष्ठ सल्लागार म्हणून शिवाजी पाटील, प्रल्हाद क्ऱ्हाळे, अशोक खुडे,विनायकराव कदम यांची निवड तर नांदेड उत्तर सचिव पदी प्रा.भास्कर थेटे,कार्याध्यक्ष डॉ राधाकृष्ण होगे सहसचिव डॉ.वसंतराव कदम, संघटक डॉ.दत्ताजी कदम, उपाध्यक्ष विनायक चव्हाण, माधव तिडके, डॉ विलास शिंदे यांची तर नांदेड महानगराध्यक्ष पदी डॉ.प्रशांत तावडे यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इंजि.प्रविण जाधव यांनी केले. यावेळी विभागीय अध्यक्ष इंजि.शे.रा.पाटील, इंजि तानाजी हुस्सेकर, नानाराव कल्याणकर, उध्दवराव सुर्यवंशी,शिवानंद पाटील मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पंडितराव कदम ड.सतिशकुमार जाधव, संभाजी ब्रिगेडचे हदगाव तालुकाध्यक्ष किरण वानखेडे आदींसह मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेडचे आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

# शक्तिपीठ, उर्जा क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्नशील-आमदार भीमराव केराम

## घोटी येथे १ कोटी रुपये खर्चाच्या सांस्कृतिक सभागृहाचे भूमिपुजन









आशिष देशपांडे, किनवट : संत श्री फुलाजी बाबा यांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने आपले मार्गक्रमण सुरू आहे. किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातील शक्तिपीठ व उर्जा क्षेत्राच्या विकासासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही आमदार भीमराव केराम यांनी दिली.

किनवट तालुक्याच्या घोटी येथील विश्वसंत परमहंस संत श्री फुलाजीबाबा सिद्धेश्वर संस्थान येथे १ कोटी रुपये खर्चाच्या सांस्कृतिक सभागृह बांधकामाचे भूमिपूजन शनिवारी दि. ५ रोजी आ.भीमराव केराम यांच्या उपस्थितीत सिद्धेश्वर संस्थान ज्ञानयोगपीठ, पटनापूर येथील केशवराव इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी आ. केराम बोलत होते. व्यासपीठावर घोटी संस्थानचे अध्यक्ष आनंदराव सुरोशे, भाजपचे सुधाकर भोयर, घोटीच्या सरपंच निर्मला मेश्राम, उपसरपंच राजू सुरोशे, किनवटचे माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, दत्ता आडे यांची प्रमुख उपस्थिती होती. आ.केराम पुढे म्हणाले की, बाबांच्या सहवासामुळे त्यांचे अनुकरण करता आले. अधिकाराचा वापर विधायक कामांसाठी करावा, या त्यांच्याच शिकवणीची शिदोरी घेवून आपली राजकीय वाटचाल सुरू आहे. मी यापूर्वी १९९३ ला आमदार असतानाही या संस्थानला निधी दिला होता. राजकीय जीवनात चढ - उतार आले, पण फुलाजी बाबांच्या प्रेरणा, आशीर्वादामुळे मी कधी हतबल, निराश झालो नाही. बाबांना गुरुदक्षिणा म्हणूनच आपण सांस्कृतिक सभागृहाला निधी मंजूर केला. भविष्यात या संस्थानला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून एक विकसित तीर्थक्षेत्र व्हावे, यासाठी आपण प्रयत्न करू, असेही आ.केराम यांनी यावेळी नमूद केले. यावेळी श्रीराम कन्स्ट्रक्शनचे संचालक श्रीनिवास नेम्मानीवार, भाजपा जिल्हा युवा अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, मारोती भरकड, बालाजी पावडे, उमाकांत कऱ्हाळे, देवराव सिरमनवार, बबलु नाईक, यांच्यासह बांधकाम विभागाचे कर्मचारी तसेच फुलाजीबाबांचे विविध ठिकाणचे भक्त, ग्रामस्थ उपस्थित होते.






नवरात्रोत्सव व विजयादशमी निमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा







लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी

"मराठी भाषेला अभिजात दर्जा भारतीय सांस्कृतीक वारसाचा गौरवशाली सन्मान."

मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याबद्दल मा.नरेंद्रजी मोदी व केंद्र शासनाचे जाहीर आभार!



किनवट नगर परिषद क्षेत्रातील
विविध विकास कामांचा
भूमीपूजन सोहळा

७.५० कोटी

किनवट/माहूर विधानसभेचे विकासपुरूष,कर्तृत्ववान
आ.भीमरावजी केराम साहेब यांचे शुभहस्ते
सोमवार, दिनांक ०७ आक्टोबर २०२४ रोजी

| वेळ | कामाचे नाव |
|---|---|
| स.१०.०० वा. | प्रभाग क्र. ६ मध्ये शिशुवाटीका येथे योगा भवन बांधणे व परिसर विकसित करने<br>प्रभाग क्र. ६ मध्ये कृष्ण मंदिर येथे पेवर ब्लॉक बसविणे |
| दु.१२.०० वा. | प्रभाग क्र. २ मध्ये सिध्दार्थनगर येथे जेतवन बौध्द विहार येथे समाज मंदिर बांधकाम करणे |
| दु.१२.३० वा. | प्रभाग क्र. २ मध्ये अण्णाभाऊ साठेनगर येथे मातंग समाजा साठी समाज मंदिर बांधकाम करणे |
| दु.०१.०० वा. | प्रभाग क्र. १ मध्ये अक्सा मस्जिद येथे पार्कींगसाठी पेवर ब्लॉक बसविणे |
| दु.०१.३० वा. | प्रभाग क्र. २ मध्ये हनुमान मंदिरालगत सभागृह बांधकाम करणे |
| दु.०२.०० वा. | प्रभाग क्र. १ मध्ये रामनगर येथील अंतर्गत सि.सि.रस्ते बांधकाम करणे<br>प्रभाग क्र. ३ मध्ये गुरूकुल शाळेजवळ अंतर्गत सि.सि.रस्ते बांधकाम करणे |
| दु.०२.३० वा. | प्रभाग क्र. ३ व ४ मध्ये भोईगल्ली येथे अंतर्गत सि.सि.रस्ते बांधकाम करणे. |

ईगल आर्ट,किनवट 9405378687

* स्वागतोत्सुक : भारतीय जनता पार्टी किनवट शहर


साप्ताहिक लोकादेशचे मालक, प्रकाशक, संपादक **साजीदोद्दीन शरफोद्दीन बडगुजर** यांनी मुद्रक **शेख राजीक शेख खाजामिया** यांच्या हिंदूस्थान ऑफसेट प्रिंटींग प्रेस, हनुमान मंदिर जवळ किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे मुद्रित करून बडगुजर भवन मोमीनपुरा, किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR/2007/20732 फोन/फॅक्स नं. (02469) 221666 भ्रमणध्वनी : 09850900628 ईमेल : sajidbadgujar@gmail.com, lokadesh@gmail.com